**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol. 11 No. 6** **July-Aug 2024**

# बी.एड. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये समायोजन शोधिका चाचणीची अंमलबजावणी व सद्यस्थितीचा अभ्यास

**डॉ. विजय संतू पाटोळे**
सहाय्यक प्राध्यापक, रयत शिक्षण संस्थेचे,
स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर, अहमदनगर
**Corresponding Author: डॉ. विजय संतू पाटोळे**
**Email:** vijay.patole9@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.13739198**

**सारांश:**

संपूर्ण जग भावभावनांनी व्यापले असून त्याचे पडसाद अनेक घटनांद्वारे आपल्या समोर वेळोवेळी येतच असतात. प्रत्येक मनुष्य प्राप्त परिस्थितीशी यशस्वी रीत्या समायोजन साधण्याचा प्रयत्न करीत असतो. या समायोजनकार्यात शिक्षणाचे साह्य घेत असतो. त्यामुळे शिक्षणाच्या क्षेत्रात समायोजनास विशेष महत्त्व आहे. एकविसावे शतक हे मानसिक अस्वास्थ्याचे शतक मानण्यात येते. त्या दृष्टीने मुलांच्या भावनांचे समायोजन करणे अतिशय महत्त्वाचे ठरते. मनाचा क्षोभ, मानसिक स्थैर्याचा अभाव, मनाची प्रक्षुब्धावस्था या बाबी भावनेशी निगडित आहेत. भावनांच्या विस्फोटकामुळे शरीरांतर्गत ग्रंथींमध्ये स्राव उत्पन्न होऊन निर्माण होणारी उर्जा व्यक्तीला कार्यप्रवण करीत असते. मनुष्याच्या मनात भावनांची बरी-वाईट निर्मिती होतच असते. मानसशास्त्रात , समायोजन ही एखाद्या व्यक्तीची स्थिती आहे जी त्यांच्या शारीरिक, व्यावसायिक आणि सामाजिक वातावरणातील बदलांशी जुळवून घेण्यास सक्षम आहे. ज्या क्षणापासून आपण जन्माला आलो आहोत, तेव्हापासून मानव सतत समायोजनाच्या स्थितीत असतो. शिक्षक म्हणून समाजात वावरताना, विद्यार्थ्यांच्या अपेक्षा पूर्ण करताना, तसेच सर्व परिस्थितीत समायोजन करता आले तर निश्चितच व्यक्तीचा सर्वांगीण विकास होण्यास सहाय्य मिळते.

सदर संशोधन लेखात भविष्यकाळात शिक्षक म्हणून सेवेत येणाऱ्या विद्यार्थी-शिक्षकांची संयोजनात काय सद्यस्थिती आहे, हे विषद करण्यात आले आहे.

**सूचक शब्द:** विद्यार्थी-शिक्षक, समायोजन शोधिका चाचणी, आरोग्य समायोजन, शैक्षणिक समायोजन.

**प्रस्तावना :**

व्यक्ती एक समाजशील प्राणी आहे, समाजात राहून व्यक्तीला आपल्या व्यक्तीमत्वाचा खऱ्या अर्थाने विकास करता येतो. व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाला खऱ्या अर्थाने आकार देण्याचे काम शिक्षणातून दिले जाते आणि यासाठी औपचारिक संस्था अतिशय महत्वाची भूमिका पार पाडत असतात, या संस्थाद्वारे खरे तर समाज शिक्षण होत असते, म्हणूनच औपचारिक संस्थेतील शाळा म्हणजे समाजाची छोटी प्रतिकृती असते असे म्हटले जाते. शालेय स्तरापासून एखाद्या व्यक्तीचा प्रवास हा सुरु होतो आणि उच्च शिक्षणापर्यंत तो चालू असतो ते थेट नोकरी, व्यवसाय, उद्योग यात स्थिर होईपर्यंत. परंतु आपण विद्यार्थ्यांच्या सुरुवातीच्या शिक्षण क्षेत्रातील वाटचालीवर जर प्रकाश टाकला तर एक विद्यार्थी म्हणून त्याला बालवाडी ते उच्च शिक्षणापर्यंत वेगवेगळ्या वातावरणात, वेगवेगळे शिक्षक, वेगवेगळ्या शाळा, महाविद्यालये आणि विविध मित्राबरोबर किंवा वर्गातील इतरांबरोबर समायोजन करावे लागते. प्रत्येक मूल हे शिकता शिकता घडत असते आणि शेवटी त्याचे वर्तन वयानुरूप साजेसे आहे की नाही हे शैक्षणिक मानसशास्त्रामुळे आपल्याला अभ्यासता येते.

बी.एड. अभ्यासक्रमाला प्रवेशित झालेले विद्यार्थी हे खऱ्या अर्थाने विविध प्रकारची शैक्षणिक पदवी प्राप्त करून आलेले असतात, विविध कौटुंबिक पार्श्वभूमी, विविध भाषिक पार्श्वभूमी तसेच विविध प्रादेशिक भागातून आलेली असतात, तसेच गरीब, श्रीमंत, साधारण आर्थिक परिस्थिती असे असलेले असतात. या अभ्यासक्रमाला प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांत काही अती प्रतिभावंत, काही मध्यम तर काही साधारण बुद्धिमत्तेचे असतात, काही शांत, काही अबोल, काही अंतर्मुख तर काही बहिर्मुख आणि विविध व्यक्तिमत्वाच्या वैशिष्ट्यानुसार आलेली असतात, यात काही समाजशील, तर काही एकल कोंडी तर काही भावनाप्रधान असतात. याचाच अर्थ असा आहे की, एक बी.एड.चा वर्ग म्हणजे संशोधनासाठीचा स्त्रोत आहे असे म्हणावे लागेल. सदर संशोधनाद्वारे खऱ्या अर्थाने बी. एड. ला प्रवेशित असणाऱ्या विद्यार्थिनीमध्ये समायोजन क्षमता कशी व किती आहे हे प्रमाणित समायोजन शोधिका चाचणीद्वारे अभ्यासले जाणार आहे.

**संशोधनाची गरज व महत्व :**

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांत ते घरात असू द्यात किंवा शाळा, महाविद्यालये किंवा समाजात असू द्यात , त्या सर्वांमध्ये आज वर्तमानात वर्तन विषयक विविध समस्या

निर्माण झालेल्या आपल्याला दिसून येत आहेत. आज महाविद्यालयीन पातळीवर विविध मूल्ये, संस्कार त्यांच्यावर रुजविले जातात मात्र तरीही विद्यार्थ्यांत स्वार्थ, खोटेपणा, उद्धटपणा, गैरवर्तन, गैरहजर राहणे, बहाणे सांगणे किंवा अती राग, उतावीळपणा, समायोजन करता न येणे, अपयश पचविता न येणे, संकटावर मात न करता येणे, सुसंवाद न साधता येणे, प्रसार माध्यमांशी जवळीक, मानसिक असंतुलन, परिस्थितीबाबत अति ताण तणाव, भविष्याची चिंता आणि घरातील मतभेद अशा अनेक समस्यानी आजचे महाविद्यालयीन विद्यार्थी त्रस्त असल्याचे आपल्याला दिसून येते आणि त्याचा परिणाम त्यांच्या वर्तनावर झालेला दिसून येतो. यामुळे भविष्यातील शिक्षण संधी, व्यवसाय संधी आणि नोकरीच्या संधीवरही परिणाम झालेला दिसून येतो. तसेच मानसिक आरोग्य धोक्यात आलेले दिसून येते. व्यक्तीच्या समस्यांवर जर योग्य उपाययोजना जर करता नाही आली तर त्याचे वाईट परिणाम सर्व समाजाला अनुभवयला लागतात.

सदर संशोधनात समायोजन शोधिका चाचणीची प्रभावी अमलबजावणी केल्यास विद्यार्थ्यात आत्मविश्वास, प्रेरणादायी व्यक्तिमत्व उदयास येईल. तसेच समाजात एक शिक्षक म्हणून सेवा देताना सर्व प्रादेशिकता, भाषा, संस्कृती, आर्थिक विषमता, लोकांतील एकमेकांवरचा विश्वास, आरोग्यदायी समाज, एकात्मता, शैक्षणिक प्रगती, समाजात सौहार्दपूर्ण संबंध निर्माण होतील. तसेच अध्ययन-अध्यापनातील सर्व समस्या दूर होतील, सर्वांच्या प्रगतीसाठी तसेच समाज आणि राष्ट्रासाठी एक सुजाण नागरिक निर्माण होतील.

**संशोधन समस्या विधान :**

'बी.एड. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये समायोजन शोधिका चाचणीची अंमलबजावणी करणे व सद्यस्थितीचा अभ्यास करणे."

**कार्यात्मक व्याख्या:**

**अ)बी.एड. :** उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना अध्यापन करण्यासाठी छात्र-शिक्षकाने पूर्ण केलेला प्रशिक्षणाचा कालावधी.

**ब)महाविद्यालयीन विद्यार्थिनी:** शैक्षणिक क्षेत्रात वरिष्ठ स्तरावर वय वर्षे १८ ते २५ दरम्यान औपचारिक शिक्षण घेत असलेल्या मुली.

**क) समायोजन क्षमता :** व्यक्तीची कौटुंबिक, आरोग्यविषयक, सामाजिक, व भावनिक परिस्थितीशी जुळवून घेण्याची प्रक्रिया म्हणजे समायोजन क्षमता होय.

**ड)समायोजन शोधिका चाचणी:** विद्यार्थ्यांच्या समायोजन मापनासाठी तयार केलेली व राष्ट्रीय मानसशास्त्रीय महामंडळाने प्रमाणित केलेली चाचणी.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये:**

अ) बी.एड. महाविद्यालयात प्रवेशित असणाऱ्या विद्यार्थ्यांचा शोध घेणे.

ब) प्रवेशित विद्यार्थ्यांवर समायोजन शोधिका चाचणी राबविणे.

क) समायोजन चाचणी राबविल्याने प्रवेशित विद्यार्थ्यांच्या वर्तमान स्थितीचा अभ्यास करणे व उपाययोजना सुचविणे.

**गृहीतके :**

अ) बी. एड. स्तरावरील विद्यार्थ्यांना समायोजनाबाबत समस्या असतात.

ब) या स्तरावरील विद्यार्थ्यांना समायोजनाबाबत मार्गदर्शन केले जात नाही.

क) विद्यार्थ्यांना समायोजन न करता आल्यामुळे विशेष शैक्षणिक प्रगती करता येत नाही.

ड) समायोजन शोधिका चाचणी राबविल्यामुळे विद्यार्थ्यांच्या वर्तनात धनात्मक बदल होतात.

**संशोधन परिकल्पना :**

बी. एड. च्या विद्यार्थ्यांवर समायोजन शोधिका चाचणी राबविल्याने त्यांच्या वर्तनात धनात्मक बदल घडून व्यक्तिमत्व विकास साधला जातो.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा:**

**व्याप्ती** : सदर संशोधन हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे संलग्नित बी.एड.महाविद्यालयात प्रवेशित असणाऱ्या विद्यार्थ्यांशी निगडीत आहे.

**मर्यादा** :

१.सदर संशोधन हे बी.एड. महाविद्यालयात प्रवेशित असणाऱ्या विद्यार्थ्यांशी मर्यादित आहे.

२. सदर संशोधन हे अहमदनगर जिल्यातील बी.एड. महाविद्यालयाशी संबंधित आहे.

३. सदर संशोधन हे रयत शिक्षण संस्थेचे स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन या महाविद्यालयाशी संबंधित आहे.

४. सदर संशोधन हे सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापुरते मर्यादित आहे.

**संशोधन पद्धती:** सदर संशोधनात वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे.

**जनसंख्या व न्यादर्श पद्धती:**

**जनसंख्या :** महाराष्ट्र राज्यातील अहमदनगर जिल्ह्यातील बी.एड.महाविद्यालये व प्रवेशित विद्यार्थ्यांचा यात समावेश केला आहे.

**न्यादर्श पद्धती:** अहमदनगर जिल्ह्यातील बी. एड. महाविद्यालयातील ३० प्रवेशित विद्यार्थ्यांची निवड असंभाव्यतेवर आधारित नमुना निवड पद्धतीमधील सहेतुक पद्धतीने केली आहे.

**माहिती संकलनाची साधने:**

प्रस्तुत संशोधनामध्ये माहिती संकलन करण्यासाठी प्रश्नावली या साधनाचा वापर करण्यात आला आहे.

**माहिती विश्लेषणाची साधने :**

प्रस्तुत संशोधनामध्ये माहितीचे विश्लेषण करण्यासाठी शेकडेवारी या साधनाचा वापर केला आहे.

**संशोधनाशी निगडीत चले:**

**अ) स्वाश्रयी चले:** प्रस्तुत संशोधनात बी.एड. प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी प्रमाणित समायोजन शोधिका चाचणी अवलंबली गेली.

**ब) आश्रयी चले:** बी.एड. महाविद्यालयात प्रवेशित असलेले सर्व विद्यार्थी.

प्रस्तुत संशोधन पेपरच्या उद्दिष्टांनुसार अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर तालुक्यातील रयत शिक्षण संस्थेच्या स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर येथील ३० छात्रशिक्षक यांच्याकडून **National Psychological Corporation Agra** यांनी प्रकाशित केलेली व **प्रोफेसर ए.के.पी. सिन्हा (पटना) आणि प्रोफेसर आर. पी. सिंग (पटना)** यांनी विकसित केलेली, **Adjustment Inventory for College Students (AICS)** समायोजन क्षमता शोधिका चाचणी या साधनाद्वारे माहिती संकलित केलेली आहे.


**समायोजन क्षमता शोधिका चाचणी द्वारे प्राप्त माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन**

**टेबल क्र. १ :विद्यार्थ्यांमध्ये श्रेणीनुसार समायोजन परिमाणांची वारंवारता आणि टक्केवारी वितरण**

| Area क्षेत्रे | Category वर्गवारी | Description of Adjustment समायोजनाचे वर्णन | Range of Scores | मुली | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | **F** | **%** |
| Home गृह | A | Excellent | 0-1 | **4** | **12** |
| | B | Good | 2-3 | **12** | **36** |
| | C | Average | 4-7 | **4** | **12** |
| | D | Unsatisfactory | 8-9 | **0** | **0** |
| | E | Very Unsatisfactory | 10 and above | | |
| | | | | | |
| Health आरोग्य | A | Excellent | 0-1 | **11** | **33** |
| | B | Good | 2-3 | **2** | **6** |
| | C | Average | 4-5 | **5** | **15** |
| | D | Unsatisfactory | 6-8 | **2** | **6** |
| | E | Very Unsatisfactory | 9 and above | **0** | **0** |
| | | | | | |
| Social सामाजिक | A | Excellent | 0-2 | **0** | **0** |
| | B | Good | 3-6 | **9** | **36** |
| | C | Average | 7-9 | **8** | **24** |
| | D | Unsatisfactory | 10-12 | **3** | **9** |
| | E | Very Unsatisfactory | 13 and above | | |
| | | | | | |
| Emotional भावनिक | A | Excellent | 0-1 | **0** | **0** |
| | B | Good | 2-7 | **7** | **21** |
| | C | Average | 8-15 | **12** | **36** |
| | D | Unsatisfactory | 16-21 | **1** | **3** |
| | E | Very Unsatisfactory | 22 and above | | |
| | | | | | |
| Educational शिक्षण | A | Excellent | 0-1 | **1** | **3** |
| | B | Good | 2-4 | **4** | **15** |
| | C | Average | 5-9 | **12** | **36** |
| | D | Unsatisfactory | 10-14 | **3** | **9** |
| | E | Very Unsatisfactory | 15 and above | | |

**१. गृह समायोजन**

**Fig. 1 Percentage Distribution of Ajustment level of 2 groups in terms of Home**




वरील आकृती क्र. १ वरून स्पष्ट होते की, घरातील समायोजनासंदर्भात मुली या मुलांपेक्षा ४% म्हणजेच अधिक प्रमाणात उत्कृष्ट स्तरावर समायोजन करू शकतात, तर १२% मुली या चांगले समायोजन करण्यास मुलांपेक्षा अग्रेसर आहेत.

**अर्थनिर्वचन** : साधारणपणे मुली या घरात समायोजन करण्यास नेहमी समर्थ असतात.

**२. आरोग्य समायोजन**

**Fig. 2 Percentage Distribution of Ajustment level of 2 groups in terms of Health**





वरील आकृती क्र. २ वरून स्पष्ट होते की, आरोग्य समायोजना संदर्भात मुली या मुलांपेक्षा ११% म्हणजेच अधिक प्रमाणात उत्कृष्ट स्तरावर समायोजन करू शकतात, तर ३% मुले हे या आरोग्याबाबत समायोजन क्षमता असमाधानकारक आहेत.

**अर्थनिर्वचन** : साधारणपणे मुले हे आरोग्य समायोजनाबाबत मुलींपेक्षा सरासरी पेक्षा कमी म्हणजेच असमाधानकारक आहेत.

**३. . सामाजिक समायोजन**


**Fig. 3 Percentage Distribution of Ajustment level of 2 groups in terms of Social**




वरील आकृती क्र. ३ वरून स्पष्ट होते की, सामाजिक समायोजनासंदर्भात मुले हे ९% म्हणजेच अधिक चांगल्या प्रमाणात सामाकिक समायोजन करू शकतात, तर फक्त ४% मुलीना सामाजिक समायोजन करता येते.

**अर्थनिर्वचन** : साधारणपणे मुली या सामाजिक समायोजनाबाबत मुलांपेक्षा पेक्षा कमी असतात.


### ४. भावनिक समायोजन




वरील आकृती क्र. ४ वरून स्पष्ट होते की, भावनिक समायोजनासंदर्भात मुले हे ४% म्हणजेच चांगल्या प्रमाणात भावनिक समायोजन करू शकतात, तर ७% मुलीना भावनिक समायोजन अतिशय चांगल्या प्रकारे करता येते.

**अर्थनिर्वचन** : साधारणपणे मुली या मुलांपेक्षा अधिक भावनिक समायोजनाबाबत अग्रेसर असतात.


### ५. शैक्षणिक समायोजन




वरील आकृती क्र. ५ वरून स्पष्ट होते की, शैक्षणिक समायोजनासंदर्भात मुले हे ६% म्हणजेच चांगल्या प्रमाणात शैक्षणिक समायोजन करू शकतात, तर १२% मुली शैक्षणिक समायोजन साधारणपणे करतात.

**अर्थनिर्वचन** : साधारणपणे मुले हे मुलींपेक्षा चांगल्या प्रकारे शैक्षणिक समायोजन करू शकतात.

**विद्यार्थ्यांची विविध समायोजन क्षेत्रात असलेली टक्केवारी**




**चाचणीवरून प्राप्त निष्कर्ष :**

१. महाविद्यालयात प्रवेशित असणाऱ्या विद्यार्थ्यांचे घर, आरोग्य आणि भावनिक समायोजन यामध्ये लक्षणीय फरक आढळून आला आहे. विद्यार्थिनी (मुली) घर आणि आरोग्य क्षेत्रात अधिक समायोजित होत्या तर विद्यार्थी (मुले) विद्यार्थी भावनिक क्षेत्रात अधिक समायोजित होते.
२. विद्यार्थी घर, आरोग्य, सामाजिक आणि भावनिक क्षेत्रात अधिक समायोजित होते.
३. मुले व मुली यात घराचे समायोजन, आरोग्य समायोजन आणि भावनिक समायोजन यामध्ये अत्यंत सांख्यिकीय महत्त्वपूर्ण फरक आहे.
४. विद्यार्थिनी मध्ये उच्च पातळीच्या भावनिक समायोजन समस्या आहेत.
५. विद्यार्थिनी मध्ये उच्च स्तरावरील शैक्षणिक समायोजन समस्या आहेत.
६. विद्यार्थिनी मध्ये आरोग्य समायोजन समस्या उच्च पातळीवर आहेत.
७. विद्यार्थ्यमध्ये उच्च पातळीच्या सामाजिक समायोजन समस्या आहेत.
८. विद्यार्थी (मुले) भावनिक क्षेत्रात मुलींपेक्षा अधिक समायोजित असतात.
९. शैक्षणिक संयोजनात मुली मुलांपेक्षा अधिक प्रमाणात जुळवून घेतात.
१०. घरातील समायोजन हे मुलींमध्ये सर्वात जास्त (३६%) प्रमाणात आढळून आले.
११. आरोग्य समायोजनाबाबत मुलांचे प्रमाण सर्वात कमी (३%) असून मुलींचे प्रमाण हे सर्वाधिक (३३%) असल्याचे दिसून आले.
१२. मुलांमध्ये सामाजिक समायोजन हे चांगल्या प्रमाणात (१२%) असून मुलींमध्ये सामाजिक समायोजन हे मुलांपेक्षा सर्वात जास्त (३३%) असल्याचे दिसून आले आहे.
१३. भावनिक समायोजनत मुले हे काही प्रमाणात (१२%) चांगल्या स्थितीत आहेत मात्र मुलींमध्ये सर्वात जास्त (२१%) भावनिक समायोजन दिसून येते तर सर्वाधिक (३६%) साधारण स्तरावरचे भावनिक समायोजन हे ही मुलींमध्ये दिसून येते.
१४. शैक्षणिक समायोजनामध्ये मुली ह्या चांगल्या (१५%) प्रमाणात आहेत तर मुले हे सुद्धा चांगल्या प्रकारे (१८%) समायोजन असलेले दिसून आले.

**शिफारशी :**

विद्यार्थी हा समाजाचा महत्त्वाचा घटक आहे आणि तो नाकारता येणार नाही. जर आपण त्यांच्याकडे दुर्लक्ष केले तर ते चुकीच्या पद्धतीने समायोजित केले जाऊ शकतात आणि त्यांच्या शैक्षणिक कार्यातील स्वारस्य गमावू शकतात आणि अनिष्ट क्रियाकलापांमध्ये गुंतल्यामुळे व्यक्तीमत्वाचा विकास होण्यास अनेक अडथळे निर्माण होऊ शकतात म्हणून पुढील शिफारशी सुचविल्या आहेत.

**विद्यार्थ्यांसाठी शिफारशी**

१. जीवनकौशल्यांची ओळख करून घ्यावी आणि त्यातील सर्व बाबींचा अंगीकार प्रत्यक्ष जीवनात करावा.
२. स्व जाणीव यातून आपले शक्तीस्थळे, उणीवा, संधी, धोके म्हणजेच स्वतचे ‘शत्रू संधो विश्लेषण’ करावे व त्यानुसार त्यावर काम करावे.
३. योग, ध्यान धारणा, प्राणायाम सारख्या क्रियेतून सुदृढ आरोग्य निर्माण करावे.

**शिक्षकांसाठी शिफारशी**

१. शिक्षकांनी सामाजिक, संज्ञानात्मक आणि भावनिक व्यवस्थापन कौशल्यांमध्ये थेट प्रशिक्षण घेणे.
२. पालक सभा घेऊन पालकांशी उत्तम संवाद स्थापन करावा व वेळोवेळी पाल्याचे निरीक्षण कळविणे.
३. महाविद्यालयात वेळोवेळी समूपदेशन सत्र, कार्यशाळा यांचे आयोजन करावे.
४. शाळा तेथे समुपदेशक या प्रमाणे समुपदेशक म्हणून मान्यताप्राप्त संस्थेमार्फत समुपदेशक प्रशिक्षण पूर्ण करावे.

५. विविध मानसशास्त्रीय प्रमाणित चाचण्यांचा अवलंब करून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी सैदव प्रयत्नशील राहावे.

**शासनासाठी शिफारशी**

१. महाविद्यालयास आरोग्य शिक्षण अंतर्गत विविध क्रीडा साहित्य अनुदान मंजूर करावे.
२. शिक्षक व मुख्याध्यापक यांच्यासाठी समायोजनावर कार्यशाळेत सहभागी होण्यास प्रोत्साहन द्यावे.

**संदर्भसूची :**


1. अभ्यंकर, शोभना व देसाई, भरत (२०१०): **प्रायोगिक मानसशास्त्र आणि संशोधन पद्धती,** पुणे नरेंद्र प्रकाशन.
2. बरकले, रामदास व पिचड नलिनी, (२०१०), **शैक्षणिक मानसशास्त्र** , इनसाईट पब्लिकेशन, नाशिक. (पृष्ठ क्र. १३२ ते १३८)
3. बापट, बा. गो. (२००९). **शैक्षणिक संशोधन पद्धती**, नित्यनूतन प्रकाशन: पुणे पृष्ठ क्र. ३४ ते ४२)
4. कुंडले सुरेखा (२००५). **संशोधन मार्गदर्शिका .** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक : (पृष्ठ क्र .२४ ते ३७)
5. ज्योती सुभाष महाजन, **कुमारावस्थेतील विद्यार्थ्यांच्या समायोजन क्षमतेचा अभ्यास,** टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
6. दुनाखे अरविंद (१९९८), **शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन आणि समूपदेशन,** पुणे, नूतन प्रकाशन.
7. दीपक चव्हाण, संदीप मुळे , **शैक्षणिक संशोधन आराखडा,** इनसाईट पब्लिकेशन नाशिक.
8. **शैक्षणिक कृतीसंशोधन आराखडा,** महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व परिषद पुणे.
9. **शैक्षणिक कृतीसंशोधन,** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
10. **Basu, S. (2012).** Adjustment of Secondary School Students, Scholarly Research Journal forInterdisciplinaryStudies, 1(3), 430-38.
11. Best,JohnW.andKhan,JamesV.2012.
12. Bhagat, Pooja 2016. Comparative study of adjustment among secondary school boysand girls. InternationalJournalof Applied Research, 2(7):91-95.